MHCO110001022023

MHCO110001022023

सादर दिनांक : १३.०४.२०२३

नोंदणी दिनांक : १३.०४.२०२३

निकाल दिनांक : २४.०३.२०२६

कालावधी : वर्ष महिने दिवस

०१ ११ ११

# न्यायाधीश, सहकार न्यायालय सातारा यांचे न्यायालयात

**<u>पिठासीन अधिकारी</u> <u>श्रीम. स्वप्नाली मेथाजी वाघमारे</u>**

**सहकार दावा : १०२/२०२३**

**निशाणी :**

किसनवीर सातारा सहकारी — वादी
साखर कारखाना लि.
भुईंज किसनवीरनगर ता. वाई
जि. सातारा.

**विरुध्द**

१. श्री. सुरेश बाळाप्पा कुल्लोळी — प्रतिवादी
धंदा—उस तोडणी वाहतुक

MHCO110001022023

रा. उमदी ता. जत जि. सांगली

२. श्री. नागनाथ महादेवाप्पा बिराजदार

धंदा—उसतोडणी वाहतुक

रा. तददेवाडी ता. इंडी जि. विजापूर

३. श्री. पंचाक्षरी ओमकार इरसुर

धंदा—उसतोडणी वाहतुक

रा. मु. टाकळी पो. उमराणी

ता. इंडी जि. विजापूर

४. श्री. नागनाथ लक्ष्मण वाल्हेकर

धंदा—शेती व उसतोडणी वाहतुक

रा. मु. पो. टाकळी ता. इंडी

जि. विजापूर

**दावा कर्ज रक्कम रु. ३,००,०००/—**

..........................................................................................

वादी तर्फे ॲड. व्ही. एन. भोईटे

प्रतिवादी क्र. १ ते ४ एकतर्फा

..........................................................................................

## न्यायनिर्णय

**दिनांक —२४.०३.२०२६**

१. महाराष्ट्र सहकार संस्था अधिनियमाचे कलम ९१ नुसार दाखल केलेल्या या

दाव्यातून वादी संस्थेने प्रतिवादी रक्कम रू. ३,००,०००/— ची मागणी केलेली आहे.

**<u>वादी संस्थेचे दाव्यातील कथन खालीलप्रमाणे आहे.</u>**

२. वादी संस्था ही महाराष्ट्र सहकारी संस्थेचा अधिनियम १९६० अन्वये नोंदलेली सहकारी संस्था आहे. प्रतिवादी हे वादी संस्थेचे सभासद आहेत. प्रतिवादी हे उुस तोडणीसाठी मजुर व वाहने पुरविण्याचे तसेच उसाची तोडणी व भरणे व वाहतुक इ. करिता वादी सभासदांकडून कराराने काम करुन घेतात. प्रतिवादी कं. १ यांनी उस तोडणी व वाहतुक करण्यासाठी वादीचे हक्कात दिनांक १४/०८/२०१८ रोजी करार करुन दिलेला आहे. या कामाकरिता प्रतिवादी नं. १ याने वादी कडून अॅडव्हान्स म्हणुन रक्कमेची उचल केलेली आहे. रक्कम उचल केल्यानुसार कराराप्रमाणे काम करण्याची जबाबदारी प्रतिवादी नं. १ वर होती. परंतु त्याने सर्व काळ काम केले नाही व कराराचा भंग केला. सदर बाबत वादीने प्रतिवादींना दि. १६/०४/२०२१ रोजी नोटीस देउन कळविले होते. परंतु प्रतिवादींनी त्याची दखल घेतली नाही. प्रतिवादी क्र. २ ते ४ हे प्रतिवादी १ च्या करारास जामीनदार आहेत व त्यांनी प्रतिवादी क्र. १ ने करारानुसार काम न केल्यास नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी स्विकारलली आहे. सबब प्रतिवादी क्र. १ ते ४ हे दाव्यातील रक्कमेस वैयक्तिक व संयुक्तिकरित्या जबाबदार आहेत. वादीने दाव्यातील व्यवहारापोटी दैनंदिन कामकाजामध्ये खाते ठेवले असून प्रतिवादी क्र. १ च्या सदर खातेनुसार त्याच्याकडून रक्कम रु. ३,००,०००/— वादी यांना देणे लागतात. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी विरुध्द सदरचा दावा दाखल केला आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना दावा समन्स काढण्यात आले होते. प्रतिवादी १ ते ४ या दाव्यात हजर झाले नाहीत. म्हणून दि. ०३/०१/२०२६ रोजी सदरचा दावा त्यांचेविरुध्द एकतर्फा चालावा म्हणून हुकूम केलेले आहेत.

४. दाव्याचा अभिलेख पहिला वादी यांचा विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील उपलब्ध वाद कथनावरुन खालील मुद्दे माझे पुढे उपस्थित राहिले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसा सह खालीलप्रमाणे.

| अ. नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी हे प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी दिनांक १४/०८/२०१८ रोजी करारनामा लिहून देउन ॲडव्हान्स रक्कम रु. ३,००,०००/— वादी कारखान्याकडून उचलेलेचे शाबीत करतात काय? | होकारार्थी |
| २ | प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी दिनांक १४/०८/२०१८ रोजीचे करारनाम्याची पुर्तता व ॲडव्हान्स रक्कमेची परतफेड केली नसलेचे वादी शाबीत करतात काय? | होकारार्थी |
| ३ | वादी मागणी करतात त्याप्रमाणे रक्कम रु. ३,००,०००/— द.सा.द.शे १८ टकके दराने व्याजाने प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचेकडून वसूल होवून मिळणेस वादी पात्र आहे का? | होकारार्थी |
| ४ | काय आदेश आणि निवाडा? | आदेशाप्रमाणे |

५. वादीतर्फे सादर केलेल्या साक्षीदाचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं | साक्षीदाराचे नाव | नि.नं |
|---|---|---|
| १ | श्री. दत्तात्रय रामचंद्र जाधव | १९ |

६. वादीने सादर केलेल्या कागदोपत्री पुराव्याचा तपशील खालीलप्रमाणे

| अ. नं. | कागदपत्राचे वर्णन | नि. नं. |
|---|---|---|
| १ | वादी कारखान्याचे अधिकारी यांचे अधिकार पत्र | २० |
| २ | वादी यांना प्रतिवादी यांनी लिहून दिलेला करारनामा | २१ |
| ३ | प्रतिवादी यांनी उचल घेतले बाबतची खाते उतारा | २९ |
| ४ | प्रतिवादी यांना पोस्टाने पाठविलेली नोटीसीची प्रत व पोचपावती | २४—२८ |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ करिता —**

७. वादी तर्फे त्यांचे दाव्यातील कथनाचे शाबीती करिता साक्षीदार क्र. १ दत्तात्रय रामचंद्र जाधव नि. नं १९ यांचा पुरावा दाखल करणेत आला. सदर पुराव्याचे प्रतिज्ञापत्रात साक्षीदाराने दाव्याचे कथनाची पुनरावृत्ती केली आहे. वादीचे कथनानुसार प्रतिवादी क्र. १ यांनी लिहून दिलेल्या दिनांक १४/०८/२०१८ चे

करारानुसार गळीत हंगामामध्ये उसाची तोड करुन कारखान्यावर गळीतासाठी पोहोच करणेची कबुल केले होते. त्या करिता प्रतिवादी यांनी वादी कडून वेळोवेळी रक्कम उचललेली आहे. वादी यांनी त्यांचे कथनाचे शाबीती करिता निशाणी २१ कडे करारनाम्याची प्रत दाखल केली आहे. सदर कागदपत्राचे अवलोकन केले असता, त्यावर प्रतिवादी क्र. १ यांनी सही करार लिहून देणार म्हणून केली असलेचे दिसते. सदरचा करारनामा मुळ स्वरुपात आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी दाव्यामध्ये हजर राहून सदरचा करारनामा नाकारलेला नाही. त्यामुळे करारनामा सत्य असलेचे दिसते. वादीचे कथनानुसार प्रतिवादी क्र. १ यांनी दिनांक १४/०८/२०१८ चे कराराचे अनुषंगाने वेळोवेळी वादी कारखान्याकडून रक्कम उचलले आहेत. वादी यांनी त्यांचे कथनाचे शाबीती करिता पावती, व्हाउचर हजर केले आहेत. सदर पावत्या प्रतिवादी क्र. १ यांच्या नावे असलेचे दिसून येत असुन त्यावर त्यांची सही आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी दाव्यामध्ये हजर राहून सदर पावत्या नाकारलेल्या नाहीत. त्यामुळे वादी कारखान्याकडून प्रतिवादी यांनी रक्कम ॲडव्हान्स घेतले असलेचे शाबीत होते. सबब मी मुद्‌दा क्र. १ करिता होकारार्थी उत्तर देते.

**<u>मुद्‌दा क्र. २ व ३ करिता</u>**

८. वादीचे कथनानुसार प्रतिवादी क्र. १ यांनी दिनांक १४/०८/२०१८ रोजीचे कराराची पुर्तता केली नाही. करारात नमुद केले नुसार गळीत हंगामात आवश्यक असणाऱ्या कामाची पुर्तता केली नाही. तसेच प्रतिवादी यांनी करारातील शर्ती व अटींचे पालन न करता घेतलेली रक्कम परत केली नाही. प्रतिवादी क्र. २ ते ४ हे प्रतिवादी क्र. १ यांचे करारास जामीनदार असल्याचे दिसून येते. करारनाम्यावर

प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी जामीनदार म्हणून सही केल्याचे दिसते. प्रतिवादी क्र. १ यांच्या कर्जाची जबाबदारी प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी स्विकारल्याचे शाबित होते. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. १ ते ४ हे दाव्यातील नमुद रक्कम ही १८ टकके व्याजाने वैयक्तिक व संयुक्तिकरित्या वादीस देणे लागतात. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी कामामध्ये हजर राहून दिनांक १४/०८/२०१८ चे कराराची पुर्तता केली असलेचे सांगितले नाही. सदरचा करार आव्हानित केलेला नाही. त्यामुळे कराराचे अनुषंगाने प्रतिवादी क्र. १ यांनी पुर्तता केली नसलेचे शाबीत होते. वादी यांनी केलेल्या ठरावानुसार द.सा.द.शे १८ टकके व्याजाने थकीत रक्कम वसुल करणेबाबत निर्णय घेतलेचे दिसते. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी दाव्यामध्ये हजर राहून वादीचे दाव्यातील कथने व दाखल कागदपत्रे यातील मजकूर आव्हानित केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ४ हे रक्कम रु. ३,००,०००/– द. सा.द.शे १८ टकके व्याज दराने वैयक्तिक व संयुक्तिकरित्या वादीस देणे लागतात हे वादीने शाबीत केले आहे. सबब मुद्दा क्र. २ ते ४ करिता होकारार्थी उत्तर नोंदविते.

**<u>मुद्दा क्र. ४ –</u>**

९. अभिलेखावरील उपलब्ध तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे आधारे प्रतिवादी क्र. १ ते ४ हे वैयक्तिक व संयुक्तिरित्या वादी पतसंस्थेस रक्कम रु. ३,००,०००/– द.सा.द.शे १८ टकके व्याज दराने देणे लागतात हे शाबीत झालेले आहे. सबब मी मुद्दा क्र. १ ते ३ च्या निष्कर्षाचे आधारे मुद्दा क्र. ४ करिता खालील आदेश पारीत करीत आहे.

MHCO110001022023

# <u>आदेश</u>

१. दावा मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी रक्कम रु. ३,००,०००/— (अक्षरी तीन लाख रुपये फकत) वैयक्तिक व संयुक्तिकरित्या वादीला परत करावेत.

३. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी थकीत रक्कमेवर द.सा.द.शे १८ टक्के इतक्या दराने होणारी व्याजाची रक्कम सदर दावा दाखल तारखेपासून ते संपूर्ण रक्कम वसुल होईपर्यंत वादीस परत करावी.

४. प्रतिवादी व वादींनी आपापला खर्च सोसणेचा आहे.

५. येणेप्रमाणे निवाडा करणेत यावा.

खुला न्यायालयात सदरचा निकाल घोषित करणेत आला.

sd/-

ठिकाण — सातारा
दिनांक — २४.०३.२०२६

**श्रीम. एस. एम. वाघमारे**
**न्यायाधीश**
**सहकार न्यायालय, सातारा.**